# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 15/09/2021 (बुधवार)

(सकाळ)

---

### चोरी

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत व्यंकटेश नगर पावडदौना रोड, मौदा येथे फिर्यादी नामे– शरद नत्थुजी देशमुख, वय 42 वर्ष, रा. स्टेट बॅक जवळ मौदा यांचे घराचे बांधकाम व्यंकटेश नगर पावडदौना रोड, मौदा येथे चालु असुन तेथे त्यांनी बांधकामासाठी खिडकी लोखंडी ग्रिल व सिमेंट आणुन ठेवले होते. त्यांनी बांधकामाचे साहित्य रुममध्ये ठेवलेले होते. दिनांक 13/09/2021 चे 18.00 वा. ते 14/09/2021 चे 08.30 वा. दरम्यान अज्ञात आरोपीने रुमचे कुलुप तोडुन रुममध्ये प्रवेश करून तेथे ठेवलेले खिकीचे 8 नग कि. 16,000/–रु. व सिमेंट 25 बॅग किं 8,000/–रू. असा एकुण कि. 24,000/–रु. चा मुद्देमाल चोरुन नेले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 457, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार चांगदेव कुथे मो.क्र. 9764007720 हे करीत आहे

### घरफोडी

पो.स्टे. कोंढाळी :– अंतर्गत 15 कि. मी. अंतरावरील मौजा बाजारगाव येथे दिनांक 14/09/2021 चे 01.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– क्रिष्णानंद लंबोदर झा, वय 58 वर्ष, रा. भाले नगर, एम व्ही ज्वेलर्स, बाजारगाव हे आपले घरी झोपले असता तीन अज्ञात आरोपीतांनी लोखंडी टॉमीने फिर्यादीचे घराचे मागील दाराचे कडी कोंडा तोडुन घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने घरातील सुटकेस मधुन जुने वापरते सोन्याचे मंगळसुत्र किमत 15,000/–रू. दोन सोन्याच्या अंगठया कि 25,000/–रू. आणि 10,000/–रोख असा एकुण कि. 50,000/–रू. चा मुद्देमाल चोरुन नेले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपीतांविरुध्द कलम 457, 380, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री देवेन्द्र सोनावले मो नं 9673526177 हे करीत आहे.

### पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. कळमेश्वर – दिनांक 13/09/2021 चे 11.00 वा. ते 11.30 वा. चे सुमारास पो.स्टे. कळमेश्वर हद्यीत फिर्यादीयांची 16 वर्षीय अल्पवयीन मुलगी हि आई हिला उत्पन्नाचा दाखला आणण्यासाठी कळमेश्वरला जात आहे असे सांगुन घरून एकटीच कागदपत्र घेवुन गेली व घरी परत आली नाही. म्हणुन फिर्यादीने आजुबाजुला तसेच नातेवाईकांकडे विचापुस केली असता कोणाकडेही मिळुन आली नाही. अल्पवयीन मुलगी हिला अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम 363 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक गायकवाड 9923988292 हे करीत आहे.


पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर